**प्रेस नोट** **दिनांक २३/०३/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**स्वारगेट पोलीस ठाणेकडील तडीपार आरोपीस पकडुन पुढील कारवाईकामी स्वारगेट पोलीस ठाणेचे ताब्यात.**

दिनांक २०/०३/२०१९ रोजी खडक पोलीस ठाणेकडील लोहीयानगर बीट मार्शलवरील कर्मचारी पोलीस शिपाई ७७७७ धोत्रे पोलीस शिपाई ८५०० पांडे असे हद्दीमध्ये रात्रगस्त करीत असताना, रात्रौ ०२.०० वा.चे सुमारास नियंत्रण कक्ष पुणे शहर येथील सी.आर.ओ. यांनी शंकरशेठ रोडवरील सेंट्रल बँकेचे ए.टी.एम मशीन एक इसम फोडण्याचा प्रयत्न करीत असलेबाबत कळवुन सदर इसमाना फोटो व्हॉटसअपव्दारे नमुद पोलीस कर्मचारी यांना पाठविला. नमुद बीट मार्शल कर्मचारी यांनी घटनेचे गांभीर्य ओळखुन शंकरशेठ रोड या ठिकाणी तात्काळ आले असता, सदरचे सेंट्रल बँकेचे ए.टी.एम हे सेव्हनलव्ह चौकाजवळील, हॉटेल चंदन याचे मागील बाजुस स्वारगेट पोलीस ठाणेचे हद्दीत असल्याचे दिसुन आले. तसेच सदर इसम बँकेचा सायरन वाजल्याने पळुन गेल्याची माहीती समजली.

नमुद बीट मार्शल कर्मचारी यांनी त्यांचेकडील असलेल्या फोटोवरुन नमुद आरोपी इसमाचा शोध घेत असताना, अप्सरा टॉकीज, डायस प्लॉट कॅनालजवळ, गुलटेकडी पुणे या ठिकाणी फोटोतील नमुद आरोपी पायी फिरत असताना दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेतले. त्याचेकडे केलेल्या प्राथमिक तपासात त्याचे नाव राहुल सुहास ओंबासे, वय २५ वर्ष रा. ४२/३० डायस प्लॉट गुलटेकडी, पुणे असे असल्याचे व तो स्वारगेट पोलीस ठाणेचे अभिलेखावरील गुन्हेगार असुन त्यास ०१ वर्षासाठी मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ पुणे शहर यांनी तडीपार केले असल्याची माहीती प्राप्त झाली. सदर आरोपीस पुढील कारवाईकामी स्वारगेट पोलीस ठाणेकडील रात्रगस्त अधिकारी सहा. पोलीस निरिक्षक, श्री. शेख यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्याचेविरुध्द स्वारगेट पोलीस ठाणेस रितसर गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

ता. २३/०३/२०१९

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर